नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/११/२०२५ (बुधवार )**

---

## पेंच व्याघ्र प्रक्लपातील वाघाबाबत आक्षेपार्ह रिल पोस्ट करणाऱ्याला नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नोटीस बजाविण्यात आली.

दिनांक ३०/१०/२०२५ रोजी इन्स्टाग्राम अकाउंट aikalaakari या वरून इन्स्टाग्राम वर एक व्यक्ती दारूची बाटली हातात घेवुन वाघाच्या डोक्यावरून हात फिरवितांना दिसतो अशी रिल पोस्ट केली होती. सदर व्हिडीओ हा खरा नसुन कृत्रिम बुध्दीमत्तेने तयार करण्यात आला होता. सदर रिल ( व्हिडीओ ) ही पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपुर याच्याशी संबधीत असुन अशा रिल मुळे पेंच व्याघ्र प्रकल्पाची बदनामी होत असुन पर्यटकामध्ये चुकीचा संदेश जात आहे.ज्यामुळे सदर व्याघ्र प्रकल्पास भेट देणाऱ्या पर्यटाकमध्ये घट होण्याची शक्यत असुन प्रकल्पास अर्थिक नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. सदर रिलमध्ये वन्यप्राणी विरोधात कृती दर्शविली जात असुन त्यामुळे वन्यजीव प्रेमींमध्ये रोष निर्माण झाला आहे. तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने सदर प्रकरणाचे गांर्भिय लक्षात घेता **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शन सायबर पोलीस स्टेशन नागपुर ग्रामीण यांनी सदर इन्स्टाग्राम अकाउंट धारक नामे राहुल रविंदर नंदा, र. सी गार्डन व्हीयु,फ्लॅट नंबर ०७,माळा क्रमांक ०१, १६ नंबर रोड सांताक्रुझा, पश्चिम मुंबई यांना कलम १६८ भारतीय नागरिक सुरक्षा संहीता अन्वये नोटीस बाजवली असुन सदर व्हिडीओ इन्स्टाग्राम वरून डिलीट करण्यात आला आहे.**



# गोवंश जनावरांना अवैधरित्या कत्तलीकरीता घेवुन जाणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद, २ आरोपी अटक
# ४९ गोवंश जनावरांची सुटका,नरखेड पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०५/११/२०२५ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पांढुर्णा कडुन नरखेड, खरसोली मार्गे ४० ते ५० बैल कत्तलीकरीता राजुरा बाजार, ता. वरूड, जि अमरावती येथे पायदळ घेवुन जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ खरसोली रोडवर सापळा रचला सकाळी ०६:१० वाजेच्या सुमारास दोन ईसम जनावरे घेवुन येतांना दिसले. पोलीसांनी शिताफिने त्यांना पकडुन नाव पत्ता विचारले असता आरोपी क्रं १. अशोक शिरपत गाडगे, वय ६७ वर्षे, रा. उदापुर, ता.वरूड जि. अमरावती, अरोपी क्रं २. जंगलु कुंजीलाल जगदेवे, वय ७५ वर्षे, रा. शहापुर, ता. वरूड, जि. अमरावती अशी माहीती प्राप्त झाली. नमुद आरोपीतांना जनावरांच्या पावत्यांबाबत विचारना केली असता त्यांच्याकडे फक्त ९ जनावरांच्या पावत्या होत्या. ४० जनावरांबाबत काहीही कगदपत्रे नव्हती. नमुद आरोपीतांना जनावारांच्या मालकांबाबत विचारपुस केली असता त्यांनी आरोपी क्रं ३. बाल्या सरपे, रा. वाडेगाव, ता. वरूड, आरोपी क्रं ४. निरंजन लोखंडे, रा. उदापुर, ता. वरूड, आणि आरोपी

क्रं ५ अजय शिंदे, रा. पंढरी , छिंदवाडा यांच्या सांगण्यावरून नमुद जनावरांना राजुरा बाजार ता. वरूड घेवुन जात आहे अशी माहीती दिली. नमुद जनावरांना गळयांला घट्ट दोरीने बांधुन त्यांना चारापाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने नेत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून ४९ गोवंश जनावरे किंमती १०,७८,००० /—रूपयांचा मुददेमाल जप्त केला. सुटका केलेल्या जनावरांना देखभालीकरीता जय श्रीकृष्ण भगवान गौरक्षण संस्था गोंडेंगाव, माणिकवाडा, ता. नरखेड, जि. नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे.

नमुद प्रकरणी वर नमुद आरोपी क्रं १ ते ५ यांच्या विरूध्द भारतीय न्याय संहीता, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपी क्र १ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.**




**नरखेड पोलीस स्टेशन कारवाई पथक**



## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## ४ गोवंश जनावरांची सुटका,देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवालापार** :— दिनांक ०४/११/२०२५ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, जबलपुर कडुन नागपुर कडे अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस जुने पोलीस स्टेशन, देवलापार समोर नाकाबंदी करत असताना नाकाबंदी च्या काही अंतरावर एक वाहन संशयीतरित्या उभे दिसले. पोलीस वाहनाजवळ जात असतांना विना क्रमांकाची ग्रे (राखाडी) रंगाची संट्रो कंपनीची कार चा चालकाने वाहन रॉग साईडने वळवुन विला ४४ हॉटेल पर्यंत नेवुन पुन्हा जबलपुर हायवेला वाहन नेले. देवलापार पोलीसांनी शिताफिने नमुद वाहनाचा पाठलाग केला. तसेच पुन्हा हिवराबाजार येथे नाकाबंदी केली असता नाकबंदी च्या ठिकाणी न थांबत वाहन चालकाने भरधाव वेगाने वाहन पुढे नेवुन वाहन सोडुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता मागची सिट काढुन त्यामध्ये ४

गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक विना क्रमांकाची गे रंगाची संट्रो कार किंमती १,००,०००/— रूपये आणि ४ गोवंश जनावरे किंमती ६५,०००/— रूपये असा एकुण किंमती १,६५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम , महाराष्ट्र पोलीस कायदा आणि मोटर वाहन कायदयाअन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या १८ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये,गुन्हे नोंद

दिनांक ०४/११/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०४/११/२०२५ रोजी नरखेड पोलीस अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना उदासिन महाराज देवस्थान परीसरात आरोपी क्रमांक १. मधुकर लक्ष्मणराव सुळे, रा. वार्ड क्र १३, इंदीरा नगर, नरखेड, जि. नागपुर, आरोपी क्रं २. मुन्ना हंसराज नरवरे, रा. वार्ड क्र नांदा शिंदे, नरखेड, आरोपी क्रं ३. रूपेश चंद्रभान कोरडे , रा. वार्ड क्रं १२ नरखेड हे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. तसेच सावरगाव रोड नरखेड येथे आरोपी क्रं ४. शेषराव भगवानजी नारनवरे, रा. वार्ड क्रं १४ आंबेडकर नगर, नरखेड अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

नमुद आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी १ असे ४ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड**:— उमरेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी पंकज रामऔतार गौतम, वय ३१ वर्षे,रा. रसुलपुरता बिल्लोरजि कानपुर ह. मु. शिला गभणे यांचे घरी किरायाने रेवतकर लेआउट हा इतवारपेठ, आठवडी बाजार, उमरेड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन खापा :—** खापा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी उध्वराव गणबाजी परीपगार, वय ६५ वर्ष, रा. नवीन वस्ती खापा हा मौजा खापा टाउन येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन केळवद :—** केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी शैलेश कुमार नरसिंह चौधरी , वय २२ वर्ष, रा. बहरीस्थान, जि चम्पारण राज्य बिहार ,ह.मु. भागेमाहेरी ता सावनेर हा मौजा परसोडी फाटा बस स्टॅडचे बाजुला येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** जलालखेडा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी कृष्णकुमार कमलप्रसाद वर्मा, वय ४५ वर्ष, रा. जुनी वस्ती जलालखेडा ता. नरखेड हा मौजा उमठा रोड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन देवलापार :—** देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रं १. शेख साजीद शेख कलीम, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं बरकती नगर, नागपुर, जि. नागपूर आणि आरोपी क्रं २. सय्यद जैद अली नवाब अली, वय १९ वर्षे, रा. अमरीन किराना स्टोर्स अरविंद नगर, पीली नदी, नागपुर हे दोघे मौजा मोरफाटा दर्गा परीसर येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन बोरी :—** बोरी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे गौरव गजानन किन्नाके, वय २५ वर्षे,रा टाकळघाट हा बालभारती मैदान येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** एमआयडीसी बोरी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी आसिफ सलाम पठाण, वय २१ वर्ष, रा. वार्ड क्र .०३, टाकळघाट, ता.

हिगणा जि.नागपुर हा भारत पेर्टोलियम डेपो जवळ, बुटीबोरी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

**पोलीस स्टेशन कन्हान :—** कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रं १. मोहमद ईस्ताक मोहम मोहरम, वय ३० वर्ष, आणि आरोपी क्रं २. मोहमद अख्तर मोहम याकुब, वय ४२ वर्ष, दोघे रा. डोबीनगर, मोमीनपुर, नागपुर हे अम्मादर्गा गाडेगाट, नदीपात्र कन्हान येथे तसेच आरोपी क्रं ३. सुरेश दुलीचंद चनकापुरे, वय ४५ वर्ष, रा. वारेगाव, ता. कामठी, जि. नागपुर हा बीकेसीपी शाळेसमोर, रोडवर, कन्हान येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन मौदा : —** मौदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रमांक १. शुभम राजु खेडेकर, वय ३० वर्षे, रा. गुरूदेव, चौक मौदा, हा मौजा कन्हान नदीचे काठ चक्रधर घाट येथे , आरोपी क्रं २. सुरज देवराव कोल्हे, वय २४ वर्षे, रा. धामनगाव ता. मौदा, हा नाथनगर, मौदा येथे तसेच आरोपी क्रं ३. शिवदास रामनाथ साखरे, वय ४० वर्षे, रा. गाव शिवपुरवा, पो. तमरादेश ता. मौजंग, जि. रिवा, राज्य म.प्र हा मौजा झुल्लर शिवार येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या एकुण १८ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये १८ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**